मीश्वरम् ॥ २६ ॥ विश्वरूपंमहाकालंसृष्टिसंहारकारकम् ॥ प्रत्ययार्थंमया
रूपंफाल्गुनायप्रदर्शितम् ॥ २७ ॥ पूर्वमेवमहाबाहोयोगिध्येयमनुत्तमम् ॥
विश्वरूपमनंतंचयस्मिन्निंद्राश्चतुर्दश ॥ २८ ॥ वसवोद्वादशादित्यारुद्राए
कादशस्मृताः ॥ सप्तर्षयःसमुद्राश्चपर्वताःसरितोद्रुमाः ॥ २९ ॥ ॥

श्वरूप आहें याचा अनुभव येण्याकरितां जें योगीजनांनीं ध्यान करण्याला योग्य असून अत्युत्तम आणि अनंत असें माझें विश्वरूप मीं पूर्वी अर्जुनाला दाखविलें आहे, कीं ज्या माझ्या विश्वरूपांत चौदा इंद्र, ॥ २७ ॥ २८ ॥ आठ वसु, बारा आदित्य, अकरा रुद्र, सप्तर्षि, सात समुद्र, पर्वत, नद्या, वृक्ष ॥ २९ ॥ ॥ ॥ ॥

सत्तावीस नक्षत्रें, दहा दिशा, भूमि, पाताळ आणि भूर्भुवःस्वर् इत्यादि वरचे लोक हे सर्व माझ्यामध्यें समावेश पावले आहेत. हे धर्मा ! याविषयीं संदेह बाळगूं नको. जो साक्षात् विश्वरूपी तोच मी आहें यांत संशय नाहीं ॥ ३० ॥ अशा प्रकारचें कृष्णाचें भाषण ऐकून धर्म ह्मणाला, हे कृष्णा ! तूं सर्व ज्ञात्यांमध्यें फार श्रेष्ठ आहेस ह्मणून अनंतव्रताचें माहात्म्य आणि त्याचा विधि

नक्षत्राणिदिशोभूमिःपातालंभूर्भुवादिकम् ॥ माकुरुष्वात्रसंदेहंसोहंपार्थ
नसंशयः ॥ ३० ॥ ॥ युधिष्ठिरउवाच ॥ ॥ अनंतव्रतमाहात्म्यंविधिंवद
विदांवर ॥ किंपुण्यंकिंफलंचास्यकिंदानंकस्यपूजनम् ॥ ३१ ॥ केनचा
दौपुराचीर्णंमर्त्यैकेनप्रकाशितम् ॥ एवंसविस्तरंसर्वंब्रूह्यनंतव्रतंमम ॥३२॥

मला सांग, व तें व्रत केलें असतां कोणतें पुण्य व कोणतें फळ प्राप्त होतें तें सांग. तसेंच या व्रताच्या संबंधानें कोणतें दान आणि कोणाची पूजा करावयाची तें सांग ॥ ३१ ॥ आणि पूर्वीं हें व्रत कोणीं केलें होतें व त्याला काय फळ प्राप्त झालें तेंही सांग. तसेंच मनुष्यलोकीं हें व्रत प्रथम कोणीं केलें तो सर्व प्रकार विस्तारपूर्वक मला सांग ॥ ३२ ॥ ॥ ॥

हें ऐकून भगवान् श्रीकृष्ण ह्मणतो, हे राजा ! पूर्वीं कृतयुगांत सुमंतु नांवाचा एक ब्राह्मण होता, त्यानें वसिष्ठगोत्रांत उत्पन्न झालेल्या भृगुनामक ब्राह्मणाची जी अत्यंत रूपवती दीक्षा नांवाची कन्या होती तिच्याशीं वेदोक्त विधीनें लग्न केलें ॥ ३३ ॥ पुढें कांही काळानें त्या सुमंतूला दीक्षेच्या पोटीं अनंत लक्षणांनीं युक्त अशी एक उत्तम कन्या झाली, तिचें

श्रीकृष्णउवाच ॥ ॥ आसीत्पुराकृतयुगेसुमंतुर्नामवैद्विजः ॥ वसिष्ठगोत्र संभूतेःसुरूपांचभृगोःसुताम् ॥ दीक्षानाम्नींचोपयेमेवेदोक्तविधिनानृप ॥ ३३ ॥ तस्याःकालेनसंजातादुहितानंतलक्षणा ॥ शीलानाम्नीसुशीला सावर्धतेपितृवेश्मनि ॥ ३४ ॥ माताचतस्याःकालेनज्वरदाहेनपीडिता ॥ विनष्टासानदीतीरेययौस्वर्गंपतिव्रता ॥ ३५ ॥ ॥

त्यानें शीला असें नांव ठेविलें. ती सुशील असून बापाच्या घरीं शुक्लपक्षींच्या चंद्रकलेप्रमाणें वाढत चालली होती ॥ ३४ ॥ पुढें कांहीं दिवस गेल्यानंतर त्या मुलीची आई दीक्षा हिला ताप घेऊन त्या तापाच्या दाहानें फार पीडित होऊन नदीतीरीं मरण पावली. ती पतिव्रता असल्यामुळें स्वर्गास गेली ॥ ३५ ॥ ॥ ॥ ॥ ॥

पुढें त्या सुमंतूनें दुसरी एका धर्मनिष्ठ पुरुषाची उपवर कन्या पाहून तिच्याशीं यथाविधि लग्न केलें. त्या त्याच्या स्त्रीचें नांव कर्कशा असें होतें ॥ ३६ ॥ तसेंच तिचें शीलही तिच्या त्या नांवाप्रमाणेंच वाईट होतें. ती मोठी कर्कशा, अतिशय रागीट, आणि नेहमीं दुसऱ्याशीं कलह करणारी अशी होती. दीक्षेची कन्या आपल्या नांवाप्रमाणें सुशीला असल्यामुळें आपल्या बा-

सुमंतुस्तुततोन्यांवैधर्मपुंसःसुतांपुनः ॥ उपयेमेविधानेनकर्कशांनामनामतः ॥ ३६ ॥ दुःशीलांकर्कशांचंडींनित्यंकलहकारिणीम् ॥ सापिशीलापितुर्गेहेगृहार्चनपराबभौ ॥३७॥ कुड्यस्तंभबहिर्द्वारदेहलीतोरणादिषु ॥ वर्णकैश्चित्रमकरोन्नीलपीतसितासितैः ॥ ३८ ॥ स्वस्तिकैःशंखपद्मैश्चअर्चयंतीपुनः पुनः ॥ ततःकालेबहुगतेकौमारवशवर्तिनी ॥ ३९ ॥ एवंसावर्धतेशीलापितृवेश्मनि मंगला ॥ पित्राद्दष्टातदातेनस्त्रीचिह्नायौवनेस्थिता ॥ ४० ॥ ॥

पाच्या येथेंच राहून गृहकृत्यांत निमग्न असे ॥ ३७ ॥ तिनें भिंतींवर, खांबांवर, दरवाज्यांवर आणि देवडीवर नानाप्रकारच्या रंगांनीं अनेक प्रकारचीं चित्रें काढून ॥ ३८ ॥ आणि तसेंच शंख, पद्म व स्वस्तिकें इत्यादि काढून घर सुशोभित करावें ॥ ३९ ॥ याप्रमाणें ती मंगलरूपिणी

मुलगी शीला आपल्या पित्याच्या घरांत वाढत असतां कांहीं दिवसांनीं यौवनावस्था प्राप्त झाली असें तिच्या बापानें पाहिलें तेव्हां ॥ ४० ॥ ती विवाहाला योग्य झाली. आहे असें जाणून सांप्रत पृथ्वीवर हिला अनुरूप असे वर कोणकोणते आहेत याविषयीं मनांत विचार करूं लागला; परंतु तसा कोणी आढळेना. तेव्हां आतां ही कोणाला द्यावी अशा विचारांत पडून फार दुःखित झाला ॥ ४१ ॥ इतक्यांत वेदवेत्त्यांत परम श्रेष्ठ व श्रीमान् असा कौंडिण्य ऋषि

तांदृष्ट्वाचिंतयामासवराननुगुणान्भुवि ॥ कस्मैदेयामयाकन्याविचार्येति सुदुःखितः ॥ ४१ ॥ एतस्मिन्नेवकालेतुमुनिर्वेदविदांवरः ॥ कन्यार्थीचागतःश्रीमान्कौंडिण्योमुनिसत्तमः ॥ ४२ ॥ उवाचरूपसंपन्नांत्वदीयांतनयांवृणे ॥ पितादद‍ौद्विजेंद्रायकौंडिण्यायशुभेदिने ॥ ४३ ॥ ॥

आपणांकरितां योग्य कन्या पहात पहात चोहोंकडे फिरत फिरत त्या सुमंतूच्या घरीं आला ॥४२॥ तेव्हां ती सुमंतूची मुलगी शीला रूपानें व गुणानें अति उत्तम आहे असें पाहून कौंडिण्य सुमंतूला ह्मणाला, ह्या तुझ्या सुरूप कन्येला वरावें अशी माझी इच्छा आहे. सुमंतूला तें त्याचें ह्मणणें मान्य झालें आणि त्याप्रमाणें त्यानें लग्नाची तयारी करून शुभ मुहूर्तावर त्या द्विजश्रेष्ठ कौंडिण्याला आपली कन्या दिली ॥ ४३ ॥ ॥ ॥ ॥

त्यानें तो विवाह आपल्या शाखेला योग्य अशा गृह्यसूत्रांत सांगितलेल्या विधीनें केला. हे धर्मराजा ! तो सोहळा फारच आनंदकारक असा झाला. आसपासच्या ऋषींच्या स्त्रियांनीं येऊन मंगलकारक गीतें गाऊन विवाहसंबंधी शिष्टाचार केला ॥ ४४ ॥ ब्राह्मण कल्याणकारक मंत्र ह्मणत होते, बंदिजन जयघोष करीत होते. याप्रमाणें सर्व पार पडल्यावर वधूवरांला आपल्या

गृह्योक्तविधिनापार्थविवाहमकरोत्तदा ॥ मंगलाचारनिर्घोषंतत्रकुर्वंतियो
षितः ॥ ४४ ॥ ब्राह्मणाःस्वस्तिवचनंजयघोषंचबंदिनः ॥ निर्वर्त्योद्वाहि
कंसर्वंप्रोक्तवान्कर्कशांद्विजः ॥ ४५ ॥ ॥ सुमंतुरुवाच ॥ ॥ किंचि
द्दायादिकंदेयंजामातुःपारितोषिकम् ॥ तच्छ्रुत्वाकर्कशाक्रुद्धाप्रोत्सार्यगृह
मंडनम् ॥ ४६ ॥ ॥ ॥ ॥

घरीं पाठविण्याचा समय आला तेव्हां सुमंतु आपल्या कर्कशानामक स्त्रीला ह्मणाला ॥ ४५ ॥ आपले जांवई आज स्वगृहीं जाणार, तेव्हां त्यांच्या संतोषाकरितां त्यांना कांहीं देणगी दिली पाहिजे. सुमंतूचें हें बोलणें ऐकून ती कर्कशा फार संतापली, आणि लग्नाकरितां जीं गुढ्या तोरणें वगैरे उभारिलीं होतीं तीं सर्व तिनें चोहोंकडे उडवून दिलीं ॥ ४६ ॥

दागदागिने वगैरे जें कांहीं होतें तें पेटींत घालून कुलूप लावून बंदोबस्त केला, आणि जांवयाला तुह्मीं आपल्या घरीं लौकर निघून जा ह्मणून सांगून, फराळाचे सामानाचा चाराचुरा वाटेंत खाण्याकरितां फराळाला ह्मणून दिला ॥ ४७ ॥ आणि सुमंतूस ह्मणाली कीं आतां घरांत कांहीं द्रव्य उरलें नाहीं, खोटें वाटत असल्यास शोधून पहा. कर्कशेचें असें भाषण ऐकून सुमंतु

पेटकेसुस्थिरंबध्वास्वगृहंगम्यतामिति ॥ भोज्यावशिष्टचूर्णेनपाथेयंचचका
रसा ॥ ४७ ॥ उवाचवित्तंनैवास्तिगृहेपश्ययदिस्थितम् ॥ तच्छ्रुत्वाविम
नाःपार्थसंयतात्मामुनिस्तदा ॥ ४८ ॥ कौंडिण्योपिविवाहेनांपथिगच्छन्
शनैःशनैः ॥ शीलांसुशीलामादायनवोढांगोरथेनहि ॥४९॥ ददर्शयमुनां
पुण्यांतामुत्तीर्यतटेरथम् ॥ संस्थाप्यावश्यकंकर्तुंगतःशिष्यान्नियुज्यवै॥५०॥

फार रंजीस झाला, आणि कांहीं उपाय नाहीं असें पाहून उगाच राहिला ॥ ४८ ॥ इकडे कौंडिण्यही विवाह यथासांग झाला तेव्हां मोठ्या संतोषानें आपल्या सासऱ्याचा निरोप घेऊन त्या नवोढा सुशील पत्नीला घेऊन उत्तम बैल जुंपिलेल्या गाडींत बसून सावकाश सावकाश मार्गक्रमण करूं लागला ॥ ४९ ॥ पुढें वाटेंत त्याला यमुना नदी लागली, ती ओलांडून तो पलीकड-

॥२१॥

च्या तीरीं गेला आणि तेथें गाडी सोडून बैलांस चारापाणी घालण्यास व गाडीचें संरक्षण करण्यास शिष्यांस सांगून आपण आपलें आवश्यक नित्यकर्म आटोपण्याकरितां स्नान करण्यास गेला ॥ ५० ॥ त्या वेळीं दोनप्रहरच्या भोजनाचा समय झाला होता म्हणून ती कौंडिण्याची स्त्री शीलाही गाडीखालीं उतरली, तों त्या यमुनेच्या तीरीं रक्तवस्त्रें नेसलेल्या अशा पुष्कळ स्त्रिया तिनें पाहिल्या ॥ ५१ ॥ त्या दिवशीं भाद्रपदशुक्ल चतुर्दशी होती म्हणून त्या स्त्रिया

मध्याह्नेभोज्यवेलायांसमुत्तीर्यसरित्तटे ॥ ददर्शशीलासास्त्रीणांसमूहंरक्तवाससाम् ॥ ५१ ॥ चतुर्दश्यामर्चयंतंभक्त्यादेवंजनार्दनम् ॥ उपगम्यशनैः शीलापप्रच्छस्त्रीकदंबकम् ॥ ५२ ॥ आर्याःकिमेतन्मेब्रूतकिंनामव्रतमीदृशम् ॥ ताऊचुर्योषितस्तांतुशीलांशीलविभूषणाम् ॥ ५३ ॥ ॥

भगवान् अनंताचें पूजन करीत होत्या. त्यांची ती पूजा पाहून ती शीला हळू हळू त्या स्त्रियांकडे जाऊन त्यांस विचारूं लागली ॥५२॥ बायांनो ! हें तुह्मीं काय करीत आहां ? अशा प्रकारच्या ह्या व्रताचें नांव काय तें मला सांगा. हें ऐकून सुस्वभाव हेंच जिचें भूषण आहे अशा त्या शीलेला त्या सर्व स्त्रिया ह्मणाल्या, याचें नांव अनंतव्रत आहे. ह्या व्रतांत भगवान् अनंताची पूजा करावयाची असते ॥ ५३ ॥ ॥ ॥ ॥

हें ऐकून शीला त्याला ह्मणाली, असें हें अत्युत्तम व्रत आहे तर मीही तें करीन ॥ ५४ ॥ परंतु याचा विधि कसा, यांत कोणतें दान द्यावयाचें आणि ह्यांत कोणाची पूजा करावयाची तें सर्व तुह्मी मला सांगा. तें ऐकून त्या स्त्रिया ह्मणाल्या, हे शीले ! उत्तम धान्याचें एक प्रस्थ[1]भर पीठ घेऊन त्याचें पुरुषसंज्ञक ह्मणजे अनरसे, घारगे इत्यादि पक्वान्न करावें ॥ ५५ ॥ त्यांतलें अर्धें

अनंतव्रतमेतद्धिव्रतेऽनंतस्तुपूज्यते ॥ साब्रवीदहमप्येतत्करिष्येव्रतमुत्तमम् ॥ ५४ ॥ विधानंकीदृशंतत्रकिंदानंकोत्रपूज्यते ॥ ॥ स्त्रियऊचुः ॥ शीलेसदन्नप्रस्थस्यपुन्नाम्नासंस्कृतस्यच ॥५५॥ अर्धंविप्रायदातव्यमर्धंभुंजीततत्स्वयम् ॥ शक्त्याचदक्षिणांदद्याद्वित्तशाठ्यविवर्जितः ॥५६॥ कर्तव्यंचसरित्तीरेसदानंतस्यपूजनम् ॥ शेषंकुशमयंकृत्वावंशपात्रेनिधायच ॥५७॥

ब्राह्मणाला दान करावें आणि अर्धें उरेल तें आपण भक्षण करावें. आपल्या शक्तीप्रमाणें ब्राह्मणाला दक्षिणा द्यावी. शठपणा करूं नये ॥ ५६ ॥ वर सांगितलेल्या दानासहित अनंताची पूजा नदीच्या कांठीं करावी, ती अशीः—दर्भांचा शेषनागकरून तो वेळूच्या परडींत ठेवावा ॥५७॥

१ एक शेर.

नंतर स्नान करून मंडलावर त्याची स्थापना करून धूप, दीप आणि चंदन इत्यादि उपचारांनीं आणि सुवासिक पुष्पांनीं अनंताची पूजा करून, नानाप्रकारच्या उत्तम पक्वान्नांचा नैवेद्य समर्पण करावा ॥ ५८ ॥ याप्रमाणें केल्यानंतर देवाच्या संनिध चांगला घट्ट असा कुंकुमानें रंगविलेला आणि चौदा गांठींचा दोरक (अनंत) ठेवून गंधादि उपचारांनीं त्याची पूजा करावी. नंतर तो दोरक, पूजा करणारा पुरुष असल्यास त्यानें आपल्या उजव्या

स्नात्वानंतंसमभ्यर्च्यमंडलेगंधदीपकैः ॥ पुष्पैर्धूपैश्चनैवेद्यैर्नानापक्वान्नसंयुतैः ॥ ५८ ॥ तस्याग्रतोदृढंन्यस्यकुंकुमाक्तंसुदोरकम् ॥ चतुर्दशग्रंथियुतंगंधाद्यैरर्चयेच्छुभैः ॥ ततस्तुदक्षिणेपुंसांस्त्रीणांवामेकरेन्यसेत् ॥ ५९ ॥ अनंतसंसारमहासमुद्रमग्नंसमभ्युद्धरवासुदेव ॥ अनंतरूपेविनियोजस्वह्यनंतसूत्रायनमोनमस्ते ॥ ६० ॥ ॥ ॥

हातांत आणि स्त्री असल्यास तिनें आपल्या डाव्या हातांत पुढील मंत्रानें मंत्रून बांधावा ॥ ५९ ॥ " हे वासुदेवा ! अनंत संसाररूपी महासमुद्रांत बुडत असलेल्या मला वर काढ, आणि तुझ्या अनंतरूपाकडे माझें अंतःकरण जडेल असें कर. हे अनंतरूपी अनंतसूत्रा ! तुला माझा वारंवार नमस्कार असो " ॥ ६० ॥ ॥ ॥

या मंत्रानें तो दोरक आपल्या हातांत बांधून भगवान् अनंताची ही कथा श्रवण करावी, नंतर भगवान् नारायण विश्वरूपी आणि मोठा प्रकाशवान् अशा अनंताचें ध्यान करून ॥ ६१ ॥ नंतर भोजन करून आपल्या घरीं जावें. स्त्रिया ह्मणतात, हे भद्रे शीले! तूं विचारिल्याप्रमाणें आह्मीं तुला हें व्रत सांगितलें. श्रीकृष्ण ह्मणतात, हे धर्मा! याप्रमाणें त्या स्त्रियांपासून अनंतव्रत

अनेनदोरकंबद्ध्वाकथांश्रुत्वाहरेरिमाम् ॥ ध्यात्वानारायणंदेवमनंतंविश्वरूपि
णम् ॥ ६१ ॥ भुक्त्वाचांतेव्रजेद्वेश्मभद्रेप्रोक्तंव्रतंतव ॥ ॥ श्रीकृष्णउवाच ॥ ॥
एवमाकर्ण्यराजेंद्रप्रहृष्टेनांतरात्मना ॥ ६२ ॥ सापिचक्रेव्रतंशीलाकरेबद्ध्वासुदो
रकम् ॥ पाथेयमर्धंविप्रायदत्वाभुक्त्वास्वयंततः ॥ ६३ ॥ पुनर्जगामसंहृष्टागो
रथेनस्वकंगृहम् ॥ भर्त्रासहैवशनकैःप्रत्ययस्तत्क्षणादभूत् ॥ ६४ ॥ ॥

श्रवण करून शीलेनें आनंदित होऊन ॥ ६२ ॥ त्या दिवशीं तेथेंच तें व्रत केलें, आणि वर सांगितल्याप्रमाणें तो चांगला दोरक आपल्या डाव्या हातांत बांधून नंतर माहेराहून जें कांहीं फराळाचें आणिलें होतें त्यांतील अर्धें ब्राह्मणाला दान करून राहिलेलें अर्धें पति नित्यकर्म करून आल्यावर त्यासहवर्तमान तिनें भक्षण केलें ॥ ६३ ॥ आणि आनंदित होऊन पुनः पतिसह-

वर्तमान बैलांच्या गाडींत बसून हळू हळू आपल्या घरीं जाऊन पोहोंचली. त्या अनंतव्रताचा तिला तत्काळ प्रत्यय आला ॥ ६४ ॥ त्या अनंतव्रताच्या प्रभावानें कौंडिण्याच्या घरांत गाई-बैलांची समृद्धि होऊन गृहाश्रम फार शोभूं लागला. तशीच धनधान्यांचीही समृद्धि झाली ॥ ६५ ॥ सर्व वस्तूंनीं त्याचें घर भरून गेलें. त्याच्या येथें नेहमीं अतीतअभ्यागताची पूजा होत

तेनानंतव्रतेनास्यबभौगोधनसंकुलम् ॥ गृहाश्रमंश्रियाजुष्टंधनधान्यसमन्वितम् ॥ ६५ ॥ आकुलंव्याकुलंरम्यंसर्वदातिथिपूजनैः ॥ सापिमाणिक्यकांचीभिर्मुक्ताहारैर्विभूषिता ॥ ६६ ॥ दिव्यवस्त्रसमायुक्तासावित्रीप्रतिमाभवत् ॥ विचचारगृहेभर्तुःसमीपेसुखरूपिणी ॥ ६७ ॥ कदाचिदुपविष्टायादृष्टोबद्धःसुदोरकः ॥ शीलायाहस्तमूलेतुभर्त्रातस्याद्विजन्मना ॥ ६८ ॥ ॥

असे यामुळें त्याचें तें घर फारच रम्य दिसूं लागलें. ती कौंडिण्याची स्त्री शीलाही हिरे, माणकें इत्यादि रत्नांनीं जडित अशा नानाप्रकारच्या अलंकारांनीं आणि उत्तम वस्त्रांनीं भूषित असल्यामुळें ॥ ६६ ॥ साक्षात् सावित्रीप्रमाणें शोभूं लागली. याप्रमाणें ती आपल्या भर्त्याच्या घरीं सुखानें नांदत असतां, एके दिवशीं ती आपल्या पतिसन्निध बसली असतां, तिच्या डा-

त्या हातांत बांधलेला तो अनंताचा दोरक त्याच्या दृष्टीस पडला ॥६७॥६८॥ तेव्हां तो कौंडिण्य ह्मणाला हे शीले ! हें काय आहे ? मी तुला वश असावें ह्मणून हा दोरा बांधिला आहेस काय ? खरें सांग, हा दोरा त्वां कशाकरितां बांधिला आहेस तो ? ॥ ६९ ॥ पतीचें असें बोलणें ऐकून ती ह्मणाली, ज्याच्या प्रसादानें मनुष्यांला धनधान्यादि सर्व संपत्ति प्राप्त होतात असा हा अनंत

किमिदंदोरकंशीलेममवश्यायकल्पितम् ॥ धृतंसुदोरकंत्वेतत्किमर्थंब्रूहित्वतः ॥ ६९ ॥ ॥ शीलोवाच ॥ ॥ यस्यप्रसादात्सकलाधनधान्यादिसंपदः ॥ लभ्यंतेमानवैश्चापिसोनंतोयंमयाधृतः ॥ ७० ॥ शीलायास्तद्वचःश्रुत्वाभर्त्रातेनद्विजन्मना ॥ श्रीमदांधेनकौरव्यसाक्षेपंत्रोटितस्तदा ॥ ७१ ॥ कोऽनंतइतिमूढेनजल्पतापापकारिणा ॥ क्षिप्तोज्वालाकुलेवह्नौहाहाकृत्वाप्रधावती ॥ ७२ ॥ ॥ ॥

मीं आपल्या हातांत बांधिला आहे ॥७०॥ श्रीकृष्ण ह्मणतात, हे धर्मा ! तें शीलेचें बोलणें ऐकून कौंडिण्यानें लक्ष्मीच्या मदानें अंध होऊन त्या अनंताचा तिरस्कार करून तो दोरक तत्काळ तिच्या दंडांतून तोडिला ॥७१॥ आणि अरे अनंत हें आहे काय ? असें ह्मणून त्या पापकारी कौंडिण्यानें

तो दोरक प्रदीप्त झालेल्या अग्नीत टाकिला. तेव्हां ती शीला हाय हाय करीत धांवत गेली ॥ ७२ ॥ तिनें तो दोरक जळतां जळतां अग्नींतून बाहेर काढून दुधाच्या भांड्यांत टाकिला. याप्रमाणें तिनें केलें तथापि तिच्या पतीनें परमेश्वराचें अवज्ञारूप जें वाईट कर्म केलें तेणें-करून तत्काळ त्याच्या सर्व संपत्तीचा नाश झाला ॥ ७३ ॥ गोधन चोरांनीं नेलें, घर जळून

शीलागृहीत्वातत्सूत्रंक्षीरमध्येसमाक्षिपत् ॥ तेनकर्मविपाकेनसाश्रीस्तस्य क्षयंगता ॥ ७३ ॥ गोधनंतस्करैर्नीतंगृहंदग्धंधनंगतम् ॥ यद्यथैवाग तंगेहेतत्तथैवपुनर्गतम् ॥ ७४ ॥ स्वजनैःकलहोनित्यंबंधुभिस्ताडनंत था ॥ अनंताक्षेपदोषेणदारिद्र्यंपतितंगृहे ॥ नकश्चिद्वदतेलोकेतेनसार्धंयु धिष्ठिर ॥ ७५ ॥ ॥ ॥ ॥

गेलें आणि द्रव्य लुटलें गेलें. जें जें जसजसें त्याच्या येथें आलें तें तें तसतसें नाहींसें झालें ॥ ७४ ॥ स्वजनांशीं त्याचा नेहमीं कलह होऊं लागला, बंधुजनांकडून मार मिळूं लागला. अनंताचा तिरस्कार केल्यामुळें त्याच्या घरांत मोठें दारिद्र्य आलें. हे धर्मा ! फार काय सांगूं ! त्याच्याशीं कोणी भाषण देखील करीनासें झालें ॥ ७५ ॥ ॥ ॥

त्याच्या शरीराला अत्यंत दुःख झालें असून मनही दुःखानें भाजून गेलें, तेव्हां तो कौंडिण्य अगदीं वैतागून गेला आणि सर्वत्र उदास होऊन आपली स्त्री शीला हिला ह्मणूं लागला ॥७६॥ हे शीले! मला हें एकाएकीं दुःख झालें याचें कारण काय तें मला कळत नाहीं, कीं जेणेंकरून माझ्या सर्व धनाचा क्षय झाला, आणि आपणास हें असें दुःख भोगावें लागत आहे ॥७७॥

शरीरेणातिसंतप्तोमनसाप्यतिदुःखितः ॥ निर्वेदंपरमंप्राप्तःकौंडिण्यःप्राहतां
प्रियाम् ॥ ७६ ॥ ॥ कौंडिण्यउवाच ॥ ॥ शीलेममेदमुत्पन्नंसहसाशो
ककारणम् ॥ येनातिदुःखमस्माकंजातःसर्वधनक्षयः ॥ ७७ ॥ स्वजनैःक
लहोगेहेनकश्चिन्मांप्रभाषते ॥ शरीरेनित्यसंतापःखेदश्चेतसिदारुणः ॥७८॥
जानासिदुर्नयःकोऽत्रकिंकृत्वासुकृतंभवेत् ॥ ॥ कृष्णउवाच ॥ ॥ प्रत्यु
वाचाथसाशीलासुशीलाशीलमंडना ॥ ७९ ॥ ॥ ॥

स्वजनांशीं घरांत नेहमीं कलह चालला आहे. माझ्याशीं कोणी बोलत देखील नाहीं. शरीराला नेहमीं संताप आणि मनांत नेहमीं खेद होत आहे ॥७८॥ तेव्हां असें आपल्या हातून काय वाईट झालें तें तुझ्या कांहीं लक्षांत येतें काय? आणि आतां आपण काय करावें

कीं, जेणेंकरून आपली स्थिति सुधरेल ? श्रीकृष्ण ह्मणतात, हे युधिष्ठिरा ! पतीचें असें बोलणें ऐकून ती सदाचारसंपन्न साध्वी शीला पतीला ह्मणाली ॥७९॥ बहुतकरून त्या भगवान् अनंताचा आपल्या हातून अपराध झाला त्या पापाचें हें फळ असावें असें मला वाटतें, याजकरितां आपण त्या अनंतासच प्रसन्न करण्याचा प्रयत्न करा ॥८०॥ असें शीलेनें सांगतांच तो कौंडि-

प्रायोनंतकृताक्षेपपापसंभवजंफलम् ॥ भविष्यतिमहाभागतदर्थंयत्नमाचर ॥ ८० ॥ एवमुक्तःसविप्रर्षिर्जगाममनसाहरिम् ॥ निर्वेदान्निर्जगामाथकौंडिण्यःप्रयतोवनम् ॥ ८१ ॥ तपसेकृतसंकल्पोवायुभक्षोद्विजोत्तमः ॥ मनसाध्यायचानंतंक्वद्रक्ष्यामिचतंविभुम् ॥ ८२ ॥ यस्यप्रसादात्संजातमाक्षेपान्निधनंगतम् ॥ धनादिकंममातीवसुखदुःखप्रदायकम् ॥ ८३ ॥ ॥

ण्यऋषि मनांत अनंताचें चिंतन करून अति पश्चात्ताप पावून अरण्यांत निघून गेला ॥ ८१ ॥ त्यानें भगवान् प्रसन्न होईपर्यंत वायु भक्षण करून तप करण्याचा निश्चय केला आणि मनांत विचार केला कीं, तो भगवान् अनंत मला कोठें दृष्टीस पडेल ॥ ८२ ॥ ज्याच्या प्रसादानें सुख आणि दुःख देणारें धनधान्यादिक मला एका क्षणांत प्राप्त झालें आणि ज्याच्या अ-

वकृपेमुळें तत्काळ तें नाहींसें झालें, असा जो अनंत त्याला मी कोठें पाहूं ॥ ८३ ॥ याप्रमाणें विचार करीत तो कौंडिण्य मोठ्या अरण्यांत भ्रमण करूं लागला. फिरतां फिरतां एके जागीं फलपुष्पांनीं सुशोभित असा एक मोठा आंब्याचा वृक्ष त्यानें पाहिला ॥ ८४ ॥ त्यावर त्याला एक देखील पक्षी दृष्टीस पडला नाहीं. मात्र तो वृक्ष कोट्यवधि किड्यांनीं बुंधापासून शेंड्यापर्यंत

एवंसंचिंतयन्सोथबभ्रामगहनेवने ॥ तत्रापश्यन्महाचूतंपुष्पितंफलितंद्रुमम् ॥ ८४ ॥ वर्जितंपक्षिसंघातैःकीटकोटिसमावृतम् ॥ तमपृच्छद्द्विजोऽनंतःक्वचिद्दृष्टोमहातरो ॥८५॥ ब्रूहिसौम्यममातीवदुःखंचेतसिवर्तते ॥ सोब्रवीद्ब्रह्मनानंतःक्वचिद्दृष्टोमयाद्विज ॥ ८६ ॥ एवंनिराकृतस्तेनसंजगामाथ दुःखितः ॥ क्वद्रक्ष्यामीतिगच्छन्सगामपश्यत्सवत्सकाम् ॥ ८७ ॥ ॥

भरलेला होता. कौंडिण्यानें त्याला विचारिलें, हे महावृक्षा ! तूं कोठें अनंत पाहिला आहेस काय ? ॥ ८५ ॥ हे सौम्या ! जर तूं पाहिला असशील तर मला सांग. त्याच्या दर्शनाकरितां माझें मन फार दुःखित झालें आहे, तेव्हां तो वृक्ष त्याला ह्मणाला हे ब्राह्मणा ! मीं त्याला कोठें-ही पाहिलें नाहीं ॥ ८६ ॥ याप्रमाणें त्या वृक्षानें नाहीं ह्मणून सांगतांच कौंडिण्य फार

दुःखित होऊन आतां मला अनंत कोठें भेटेल असा विचार करीत चालला, तों एक सवत्स गाय त्याच्या दृष्टीस पडली ॥ ८७॥ हे धर्मा! ती गाय रानांत जिकडेतिकडे धांवत होती. तिला पाहून कौंडिण्य ह्मणाला, हे गाई! अनंताला तूं कोठें पाहिलें असलें तर मला सांग ॥८८॥ तें ऐकून ती गाय ह्मणाली, अनंताला मी मुळीं जाणतही नाहीं. तें ऐकून कौंडिण्य पुढें

वनमध्येप्रधावंतीमितश्चेतश्चपांडव ॥ सोऽब्रवीद्धेनुकेब्रूहियद्यनंतस्त्वयेक्षितः ॥ ८८ ॥ गौरुवाचाथकौंडिण्यंनानंतंवेद्म्यहंद्विज ॥ ततोव्रजन्ददर्शाग्रेवृषभंशाद्वलेस्थितम् ॥ ८९ ॥ दृष्ट्वापप्रच्छगोस्वामिन्ननंतोवीक्षितस्त्वया ॥ वृषभस्तमुवाचेदंनानंतोवीक्षितोमया ॥ ९० ॥ ततोव्रजन्ददर्शाग्रेरम्यंपुष्करिणीद्वयम् ॥ अन्योन्यजलकल्लोलैर्वीचीपर्यंतसंगतम् ॥ ९१ ॥

चालला, तों एक बैल हिरव्या गवतांत उभा आहे असें त्यानें पाहिलें ॥ ८९ ॥ त्याला पाहून कौंडिण्य ह्मणाला, हे गोपते! अनंताला तूं कोठें पाहिलें आहेस काय? तें ऐकून तो बैल ह्मणाला, मीं अनंताला कोठेंही पाहिलें नाहीं ॥ ९० ॥ तें ऐकून कौंडिण्य पुढें चालला तों अत्यंत रम्य अशा दोन तळ्या त्यानें पाहिल्या. त्यांच्या उदकाच्या लाटा एकमेकींच्या उदकांत

शिरून जणूं काय परस्परांस भेटतच आहेत असें दिसत होतें.॥ ९१॥ त्या कमलें, शतपत्रें, आणि कुमुदें इत्यादिकांनीं व्याप्त व सुशोभित होत्या. गुंजारव करणारे असे भ्रमर आणि चक्रवाक, हंस, कारंडव, बगळे इत्यादि अनेक पक्षी त्यांच्या आसपास संचार करीत होते ॥ ९२॥ अशा त्या दोन सुंदर तळ्या पाहून त्यांस कौंडिण्यानें विचारिलें, अहो! तुह्मीं कोठें अनंताला

छन्नंकमलकह्लारैःकुमुदोत्पलमंडितम् ॥ सेवितंभ्रमरैर्हंसैश्चक्रकारंडवैर्बकैः ॥ ९२ ॥ तेअपृच्छद्द्विजोऽनंतोयुवाभ्यामुपलक्षितः ॥ ऊचतुस्तेपुष्करिण्यौ नानंतोवीक्षितोद्विज ॥ ९३ ॥ ततोव्रजन्ददर्शाग्रेगर्दभंकुंजरंतथा ॥ ताव प्युक्तौद्विजेनेत्थंनेतिताभ्यांनिवेदितम् ॥ ९४ ॥ एवंसपृच्छन्नष्टाशस्तत्रैव निषसादह ॥ कौंडिण्योविह्वलीभूतोनिराशोजीवितेनृप ॥ ९५ ॥

पाहिलें आहे काय? तें ऐकून त्या तळ्या ह्मणतात, हे ब्राह्मणा! आह्मीं त्याला कोठेंही पाहिलें नाहीं ॥ ९३ ॥ असें त्यांचें उत्तर ऐकून कौंडिण्य पुढें चालला तों त्यानें एक गाढव आणि एक मोठा हत्ती असे पाहिले. तेव्हां त्यांनाही अनंताला कोठें पाहिलें काय ह्मणून विचारिलें. तें ऐकून त्यांनींही आपण कोठें त्याला पाहिलें नाहीं ह्मणून सांगितलें ॥९४॥ याप्रमाणें त्यानें ज्यांला

ज्यांला विचारिलें त्यांनीं त्यांनीं आह्मीं पाहिला नाहीं ह्मणून सांगितलें, तेव्हां तो अगदीं निराश होऊन तेथेंच बसला. त्या वेळीं तो खाण्यावांचून फिरण्याच्या योगानें फार व्याकुळ होऊन आपल्या प्राणाविषयीं देखील निराश झाला होता ॥ ९५ ॥ हे धर्मा ! तो अत्यंत उष्ण असा मोठा सुस्कारा टाकून भूमीवर निश्चेष्ट पडला. कांहीं वेळानंतर तो कौंडिण्य ब्राह्मण शुद्धीवर येऊन अनंत ! अनंत ! ! असें ह्मणत उठून बसला ॥ ९६ ॥ हे धर्मा ! आपणाला अनं-

दीर्घमुष्णंचनिःश्वस्यपपातभुविभारत ॥ प्राप्यसंज्ञामनंतेतिजल्पन्नुत्थाय सद्विजः ॥ ९६ ॥ नूनंत्यक्ष्याम्यहंप्राणानितिसंकल्प्यचेतसि ॥ यावदुद्बंधनंवृक्षेचक्रेतावद्युधिष्ठिर ॥ ९७ ॥ कृपयानंतदेवोऽस्यप्रत्यक्षंसमजायत ॥ वृद्धब्राह्मणरूपेणइतएहीत्युवाचतम् ॥ ९८ ॥ ॥ ॥

ताचें दर्शन होत नाहीं असें जाणून आतां आपण प्राणत्याग करावा असा विचार करून तो तेथून उठला आणि प्राणत्याग करण्याकरितां एका झाडाला दोर बांधून त्याचा फांस आपल्या गळ्याला लाविला ॥ ९७ ॥ तों भगवान् अनंत कृपाळु होऊन त्याच्यावर अनुग्रह करण्याकरितां वृद्ध ब्राह्मणाचें रूप धरून तेथें प्रत्यक्ष प्राप्त झाला, आणि त्या कौंडिण्यास ह्मणाला, हे ब्राह्मणा ! इकडे ये ॥ ९८ ॥ ॥ ॥

॥२८॥ असें ह्मणून त्याचा उजवा हात धरून त्याला आपल्याबरोबर एका गुहेंत घेऊन गेला. तेथें गेल्यावर त्या गुहेंत त्यानें सुंदर स्त्रीपुरुषांनीं भरलेली अशी आपली नगरी दाखविली ॥९९॥ त्या नगरींत एका दिव्य सिंहासनावर आपण बसलों आहें आणि पार्श्वभागीं शंख, चक्र, गदा व पद्म हीं प्रत्यक्ष मूर्तिमंत आपली सेवा करीत आहेत आणि गरुड हात जोडून आहे

प्रगृह्यदक्षिणेपाणौगुहायांप्रविवेशतम् ॥ स्वांपुरींदर्शयामासदिव्यनारीनरै र्युताम् ॥ ९९ ॥ तस्यांनिविष्टमात्मानंदिव्यसिंहासनेशुभे ॥ पार्श्वस्थशं खचक्राब्जगदागरुडशोभितम् ॥ १०० ॥ दर्शयामासविप्रायविश्वरूपमनं तकम् ॥ विभूतिभेदैश्चानंतैराजंतममितौजसम् ॥ १०१ ॥ कौस्तुभेनवि राजंतंवनमालाविभूषितम् ॥ तंदृष्ट्वादेवदेवेशमनंतमपराजितम् ॥ १०२ ॥

॥ १०० ॥ असें त्या कौंडिण्यास दाखविलें. तेव्हां तें भगवंताचें विश्वरूप, अनंत विभूतींनीं विराजमान असून अमित तेजवान् ॥१०१॥ आणि कौस्तुभमण्यानें विराजित असून वनमालेनें विभूषित असें पाहून त्यानें परमानंदेंकरून अपराजित अशा त्या देवदेवेशाला ॥१०२॥ ॥२८॥

जय देव, जय भगवन्, जय अनंत असें मोठ्यानें ह्मणून नमस्कार घातला, आणि हात जोडून तो त्या अनंताला ह्मणाला, मी पापी आहें, पापकर्मा आहें, मी पापात्मा आहें, आणि माझा जन्महीं पापापासूनच आहे॥१०३॥ ह्मणून हे भगवन् पुंडरीकाक्षा! माझें रक्षण कर आणि माझ्या पापांचा नाश कर. हे भगवन्! तुझ्या चरणकमलांवर मीं आपलें मस्तक ठेविलें त्यामुळें

वंदमानोजगादोच्चैर्जयशब्दपुरःसरम् ॥ पापोऽहंपापकर्माहंपापात्मापापसंभवः ॥ १०३ ॥ त्राहिमांपुंडरीकाक्षसर्वपापहरोभव ॥ अद्यमेसफलंजन्मजीवितंचसुजीवितम् ॥ १०४ ॥ यत्तवांघ्र्यब्जयुगलेमन्मूर्धाभ्रमरायते ॥ तच्छ्रुत्वानंतदेवेशःप्राहसुस्निग्धयागिरा ॥ १०५ ॥ माभैस्त्वंब्रूहिविप्रेंद्रयत्तेमनसिवर्तते ॥ ॥ कौंडिण्यउवाच ॥ ॥ मयाभूत्यवलिप्तेनत्रोटितोनंतदोरकः ॥ १०६ ॥ ॥ ॥

आज माझ्या जन्माचें साफल्य झालें आणि आजपर्यंत वांचल्याचेंही सार्थक झालें. कौंडिण्यानें ह्याप्रमाणें केलेली प्रार्थना ऐकून प्रभु स्निग्ध अशा वाणीनें ह्मणतात ॥ १०४ ॥ १०५ ॥ हे ब्राह्मणश्रेष्ठा! भिऊं नको. तुझ्या मनांत जें काय असेल तें सांग. तें ऐकून कौंडिण्य ह्मणाला,

हे प्रभो! मी ऐश्वर्यमदानें मत्त होऊन माझ्या स्त्रीनें आपले दंडांत बांधिलेला अनंताचा दोरक तोडिला ॥१०६॥ त्या पापानें माझें सर्व ऐश्वर्य नष्ट झालें. घरांतल्या मनुष्यांशीं नेहमीं भांडणें होऊं लागलीं. कोणीही माझ्याशीं भाषण करीनासें झालें ॥१०७॥ हे भगवन्! त्यामुळें वैताग पावून तुझ्या दर्शनाच्या इच्छेनें अरण्यांत हिंडत होतों; परंतु हे देवदेवेश! तूं कृपा करून

तेनपापविपाकेनभूतिर्मेप्रलयंगता ॥ स्वजनैःकलहोगेहेनकश्चिन्मांप्रभाष
ते ॥ १०७ ॥ निर्वेदाद्भमितोऽरण्येतवदर्शनकांक्षया ॥ कृपयादेवदेवे
शत्वयात्मासंप्रदर्शितः ॥ १०८ ॥ तस्यपापस्यमेशांतिंकारुण्याद्वक्तुमर्हसि
॥ ॥ श्रीकृष्णउवाच ॥ ॥ तच्छ्रुत्वानंतदेवेशउवाचद्विजसत्तमम् ॥१०९॥

आपलें दर्शन दिलेंस आणि आपलें दिव्यरूपही दाखविलेंस ॥१०८॥ करितां आतां माझें दुसरें कांहीं एक मागणें नाहीं. माझ्या हातून जें मोठें पाप झालें आहे तें कशानें दूर होईल हें कृपा करून सांग. श्रीकृष्ण ह्मणतो, हे राजा धर्मा! तें त्या ब्राह्मणाचें वचन ऐकून देवदेवेश भगवान् अनंत त्या कौंडिण्यावर अनुग्रह करिता झाला ॥ १०९ ॥ ॥ ॥

हे राजा! भक्तीनें संतुष्ट केलेला देव काय देणार नाहीं? भगवान् अनंत त्या कौंडिण्याला ह्मणाला, हे कौंडिण्या! आतां उशीर लावूं नकोस, लवकर आपल्या घरीं जा॥११०॥ आणि भक्तिपूर्वक चौदा वर्षेपर्यंत अनंतव्रत कर, ह्मणजे तूं सर्व पापांपासून मुक्त होऊन उत्तम सिद्धीप्रत पावशील॥१११॥ आणि पुत्रपौत्रादियुक्त होऊन ऐहिक सर्व सुखांचा यथेच्छ उपयोग

भक्त्यासंतोषितोदेवःकिंनदद्याद्युधिष्ठिर॥ ॥अनंतउवाच॥ ॥स्वगृहेगच्छकौंडिण्यमाविलंबंकुरुद्विज॥ ११० ॥ चरानंतव्रतंभक्त्यानववर्षाणिपंचच॥ सर्वपापविशुद्धात्माप्राप्स्यसेसिद्धिमुत्तमाम् ॥ १११ ॥ पुत्रपौत्रान्समुत्पाद्यभुक्त्वाभोगान्यथेप्सितम् ॥अंतेमत्स्मरणंप्राप्यमामुपैष्यस्यसंशयम् ॥ ११२ ॥ अन्यंचतेवरंदद्मिसर्वलोकोपकारकम् ॥ इदमाख्यानकवरंशीलानंतव्रतादिकम् ॥ ११३ ॥

घेऊन अंतीं माझें स्मरण होऊन निःसंशय माझ्या पदाला पावशील ॥ ११२ ॥ याशिवाय जेणेंकरून सर्व लोकांवर उपकार होतील असा एक तुला दुसरा वर देतों; तो हा कीं, हें उत्तम आख्यान ज्यांत शीलेनें अनंतव्रत केल्याची आणि तूं अनंताचा अपमान केला इत्यादि

कथा आहे ॥११३॥ असें हें जो मनुष्य श्रवण करील आणि त्याप्रमाणें अनंताचें शुभ व्रत करील तो तत्काल पापांपासून मुक्त होऊन उत्तम गतीप्रत पावेल ॥११४॥ हे ब्राह्मणा! आतां तूं ज्या वाटेनें येथें आलास त्याच वाटेनें लौकर परत घरीं जा. या प्रकारचें अनंताचें वचन श्रवण करून कौंडिण्य त्यास ह्मणतो, हे स्वामी! मी कांहीं विचारितों तेवढें मला सांगा.

करिष्यतिनरोयस्तुकुर्वन्व्रतमिदंशुभम् ॥ सोचिरात्पापनिर्मुक्तःप्राप्नोति परमांगतिम् ॥ ११४ ॥ गच्छविप्रगृहंशीघ्रंययायेनागतोह्यसि ॥ ॥ कौंडिण्यउवाच॥ ॥ स्वामिन्पृच्छामितेब्रूहिकिंचित्कौतूहलंमया ॥११५॥ अरण्येभ्रमताद्दष्टंतद्वदस्वजगद्गुरो ॥ यश्चूतवृक्षःकस्तत्रकागौःकोवृषभस्त था ॥११६॥ कमलोत्पलकह्लारैःशोभितंसुमनोहरम् ॥ मयादृष्टंमहारण्ये किंतत्पुष्करिणीद्वयम् ॥ ११७ ॥

मीं या अरण्यांत फिरतां फिरतां कांहीं कौतुक पाहिलें तें काय आहे तें मला सांगा. तें कौतुक हें कीं, तो जो मीं आम्रवृक्ष पाहिला तो कोण? गाय ती कोण? बैल तो कोण? ॥११५॥११६॥ सुंदर कमलांनीं सुशोभित दोन तळ्या त्या कोण? ॥ ११७ ॥ ॥

गाढव तो कोण ? हत्ती तो कोण ? आणि तो ब्राह्मण पाहिला तो कोण ? कौंडिण्यानें असें विचारलेलें ऐकून भगवान् अनंत त्यास ह्मणतात, जो तूं आम्रवृक्ष पाहिलास तो एक वेदविद्या-विशारद ब्राह्मण होता ॥ ११८॥ त्यानें आपणाजवळची विद्या शिष्यांना दिली नाहीं यामुळें तो आम्रवृक्ष झाला. जी गाय पाहिलीस ती पृथ्वी होय. तिनें पूर्वीं सर्व औषधींचीं बीजें आ-

कःखरःकुंजरःकोऽसौकोऽसौवृद्धोद्विजोत्तमः ॥ ॥अनंत उवाच॥ ॥स
चूतवृक्षोविप्रोऽसौवेदविद्याविशारदः ॥ ११८॥ विद्यानदत्ताशिष्येभ्यस्ते
नासौतरुतांगतः ॥ यागौर्वसुंधरादृष्टासापूर्वंबीजहारिणी ॥ ११९ ॥ वृषो
धर्मस्त्वयादृष्टःशाद्वलेयःसमास्थितः ॥ धर्माधर्मव्यवस्थानंतच्चपुष्करिणी
द्वयम् ॥ १२० ॥ ब्राह्मण्यौकेचिदप्यास्तांभगिन्यौतेपरस्परम् ॥ धर्माधर्मा
दियत्किंचित्तन्निवेदयतोमिथः ॥ १२१ ॥ ॥ ॥

पल्या अंगांत जिरवून टाकिल्यामुळें तिला तें रूप मिळालें ॥११९॥ जो तूं बैल पाहिलास तो धर्म होय. तो बैलाचें रूप धरून हिरव्या गवतांत उभा होता. ज्या दोन तळ्या तूं पाहिल्यास त्या धर्म आणि अधर्म यांच्या व्यवस्था होत ॥ १२० ॥ त्या पूर्वजन्मीं ब्राह्मणकुळांत उत्पन्न

झालेल्या दोन सख्या बहिणी होत्या. त्या दोघींचें एकमेकींवर फार प्रेम असे. धर्माधर्मादि जें
कांहीं करणें तें त्या दोघी एकमेकींतच करीत ॥१२१॥ त्यांनीं ब्राह्मणाला किंवा अतिथि, दरिद्री
इत्यादिकांला कांहीं दिलें नाहीं. भिकाऱ्याला भिक्षाही कधीं घातली नाहीं, त्या पापकर्मांनें
॥ १२२ ॥ त्या मोठमोठ्या लाटांच्या माळांनीं एकमेकींत प्रवेश करीत आहेत. त्यांचें उदक

विप्रायनकचिद्दत्तमतिथौदुर्बलेऽपिवा ॥ भिक्षानदत्ताचार्थिभ्यस्तेनपापेनक
र्मणा ॥ १२२ ॥ वीचीकल्लोलमालाभिर्गच्छतस्तेपरस्परम् ॥ खरःक्रोधस्तु
योदृष्टःकुंजरोमदउच्यते ॥१२३॥ ब्राह्मणोऽसावनंतोऽहंगुहासंसारगह्वरम् ॥
इत्युक्त्वादेवदेवेशस्तत्रैवांतरधीयत ॥ १२४ ॥ स्वप्नप्रायंततोदृष्ट्वाततःस्व
गृहमागतः ॥ कृत्वानंतव्रतंसम्यङ्नववर्षाणिपंचच ॥ १२५ ॥ ॥

कधीं बाहेर जात नाहीं. जो तूं गाढव पाहिलास तो क्रोध गाढवाच्या रूपानें हिंडत होता. जो
हत्ती तूं पाहिलास तो मद होय ॥१२३॥ जो तूं म्हातारा ब्राह्मण पाहिलास तो मीच अनंत.
जी गुहा पाहिलीस ती संसाररूप गुहा होय. हे ब्राह्मणा ! याप्रमाणें तूं विचारिलेंस त्या प्रश्नाचें
उत्तर दिलें. इतकें बोलून देवदेवेश भगवान् तेथेंच अंतर्धान पावले॥१२४॥तेव्हां तें सर्व स्वप्नप्राय

॥३१॥

झालेलें पाहून कौंडिण्य आपल्या घरीं आला. नंतर चौदा वर्षें त्यानें यथाविधि अनंतव्रत केलें ॥१२५॥ श्रीकृष्ण ह्मणतात, हे पंडुपुत्रा धर्मा! अनंतानें सांगितलें होतें त्याप्रमाणें पुत्रपौत्रादिकांसहवर्तमान मोठें ऐश्वर्य भोगून अंतीं अनंताचें स्मरण प्राप्त होऊन तो कौंडिण्य अनंताच्या नगराला प्राप्त झाला ॥१२६॥ हे राजा धर्मा! तसेंच तूं ही कथा श्रवणपूर्वक अनंताचें व्रत

भुक्त्वासर्वमनंतेनयथोक्तंपांडुनंदन ॥ अंतेचस्मरणंप्राप्यगतोऽनंतपुरेद्विजः ॥ १२६ ॥ तथात्वमपिराजर्षेकथांशृण्वन्व्रतंकुरु ॥ प्राप्स्यसेचिंतितंसर्वमनंतस्यवचोयथा ॥ १२७ ॥ यद्वैचतुर्दशेवर्षैफलंप्राप्तंद्विजन्मना ॥ वर्षेकेन तदाप्नोतिकृत्वासाख्यानकव्रतम् ॥ १२८ ॥ एतत्तेकथितंभूपव्रतानामुत्तमं व्रतम् ॥ यच्छ्रुत्वासर्वपापेभ्योमुच्यते नात्रसंशयः ॥ १२९ ॥ ॥


कर; ह्मणजे अनंताच्या वचनाप्रमाणें तुझें सर्व चिंतित कार्य सिद्ध होईल ॥१२७॥ कौंडिण्यानें चौदा वर्षें व्रत करून जें फल त्याला प्राप्त झालें तें एकच वर्ष कथाश्रवणपूर्वक अनंताचें व्रत केल्यानेंही प्राप्त होतें ॥१२८॥ हे धर्मराजा! सर्व व्रतांत जें उत्तम व्रत तें तुला सांगितलें; हें केल्यानें मनुष्य सर्व पापांपासून मुक्त होतो यांत संशय नाहीं ॥ १२९ ॥ ॥

अधिक तर काय? ही कथा जे कोणी वाचलेली सतत श्रवण करितील अथवा जे कोणी पठण करितील तेही पापापासून मुक्त होऊन वैकुंठास जातील ॥ १३० ॥ हे कुरुकुलोद्भवा धर्मा! ह्या संसाररूपी गुहेमध्यें सुखानें विहार करण्यास जे इच्छितात, आणि ज्यांचीं अंतःकरणें शुद्ध

येपिशृण्वंतिसततंपठ्यमानंपठंतिये ॥ तेपिपापविनिर्मुक्ताःप्राप्स्यंतिच हरेःपदम् ॥ १३० ॥ संसारगह्वरगुहासुसुखंविहर्तुंवांछंतियेकुरुकुलोद्भव शुद्धसत्त्वाः ॥ संपूज्यचत्रिभुवनेशमनंतदेवंबध्नंतिदक्षिणकरेवरदोरकंते ॥ १३१ ॥ इतिश्रीमद्भविष्योत्तरपुराणोक्ताश्रीमदनंतव्रतकथासमाप्ता ॥ श्रीमदनंतार्पणमस्तु ॥ ॥ ॥

आहेत व जे त्रिभुवनेश्वर जो भगवान् अनंत त्याची पूजा करून त्याचा जो दोरक आपल्या उजव्या दंडामध्यें बांधतात ते इहलोकीं सर्व सुखें भोगून अंतीं मोक्षपदाला प्राप्त होतील ॥ १३१॥ इति श्रीभविष्योत्तरपुराणोक्तश्रीमदनंतव्रतकथा ॥ ॥ ॥

हें पुस्तक वे. शा. रा. रा. गोविंद शंकरशास्त्री बापट यांनीं तयार केलें. तें मुंबईमध्यें "निर्णयसागर" छापखान्याचे मालक तुकाराम जावजी यांनीं आपल्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें. शके १८२७ सन १९०५.


॥ इति अनंतचतुर्दशीपूजा सार्थकथा ॥

[OrderDescription]
,CREATED=12.06.20 12:55
,TRANSFERRED=2020/06/12 at 13:02:46
,PAGES=72
,TYPE=STD
,NAME=S0003127
,Book Name=M-967-ANANTCHATURDASHI PUJA
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF

FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF

FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF
,FILE28=00000028.TIF
,FILE29=00000029.TIF
,FILE30=00000030.TIF
,FILE31=00000031.TIF
,FILE32=00000032.TIF
,FILE33=00000033.TIF
,FILE34=00000034.TIF
,FILE35=00000035.TIF
,FILE36=00000036.TIF
,FILE37=00000037.TIF
,FILE38=00000038.TIF
,FILE39=00000039.TIF
,FILE40=00000040.TIF
,FILE41=00000041.TIF
,FILE42=00000042.TIF

FILE43=00000043.TIF
,FILE44=00000044.TIF
,FILE45=00000045.TIF
,FILE46=00000046.TIF
,FILE47=00000047.TIF
,FILE48=00000048.TIF
,FILE49=00000049.TIF
,FILE50=00000050.TIF
,FILE51=00000051.TIF
,FILE52=00000052.TIF
,FILE53=00000053.TIF
,FILE54=00000054.TIF
,FILE55=00000055.TIF
,FILE56=00000056.TIF
,FILE57=00000057.TIF
,FILE58=00000058.TIF
,FILE59=00000059.TIF

FILE60=00000060.TIF
,FILE61=00000061.TIF
,FILE62=00000062.TIF
,FILE63=00000063.TIF
,FILE64=00000064.TIF
,FILE65=00000065.TIF
,FILE66=00000066.TIF
,FILE67=00000067.TIF
,FILE68=00000068.TIF
,FILE69=00000069.TIF
,FILE70=00000070.TIF
,FILE71=00000071.TIF
,FILE72=00000072.TIF
,